## महानगरपालिका एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी (एनयुएचएम., जळगांव)

राष्ट्रीय आरोग्य अभियान जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव अंतर्गत खालील पद **करार** पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात भरावयाचे आहे.

| पदाचे नांव | पद संख्या | मानधन एकत्रित दरमहा | प्रवर्ग | किमान शैक्षणीक पात्रता | अनुभव/ अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|
| Medical Officer | 8 | 60000 | SC - 1<br>ST – 1<br>VJ – 1<br>OBC – 1<br>OBC – 1 **(30% Female Resevation)**<br>EWS - 1<br>OPEN –1<br>OPEN – 1 **(30% Female Resevation)** | MBBS – MMC Registration | Preference to experienced candidate | 70 Years |
| Part Time Medical Officer | 1 | 30000 | No Reservation – | MBBS – MMC Registration, Peadiatrician, General Physician | Preference to experienced candidate | 70 Years |
| ANM | 3 | 18000 | SC - 1<br>OBC – 1<br>OBC – 1 **(30% Female Resevation)** | 10th Pass with ANM Course MNC Registration | Preference to experienced candidate | For Open 38 Years and Reserve 43 Years |
| Staff Nurse | 2 | 20000 | ST-1<br>OBC – 1 | GNM course /B.Sc Nursing and MNC Registration | Preference to experienced candidate | Maximum 65 Yeras |
| Pharmacist | 2 | 17000 | ST – 1<br>VJ-1 | D. Pharm / B. Pharm | Preference to experienced candidate | For Open 38 Years and Reserve 43 Years |
| District Pharmacist (NTEP Department) | 1 | 17000 | Open -1 | Degree/ Diploma in Pharmacy from recognized university | One year experience in managing drug store in a reputed hospital/health center recognized by Government Candidate should well conversant with various computer programming including MS,Word, Excel & simples statistical packages | Maximum 65 Yeras |
| Lab Technician | 3 | 17000 | SC – 1<br>OBC-1<br>Open- 1 | B.Sc DMLT form Govt. recognised Inst. | Preference to experienced candidate | For Open 38 Years and Reserve 43 Years |
| Quality Programme Assistant | 2 | 18000 | Open-1<br>OBC – 1 | Any graduate English & Marathi typing 30 w.p.m & MS-CIT | Preference to experienced candidate | For Open 38 Years and Reserve 43 Years |
| Accountant<br><br>(NTEP Department) | 1 | 18000 | Open-1 | 1. Graduate in Commerce<br>2. Two years of expérience in Maintenance of accounts | 1. Familiarity with audit in a recognized society or institution. | Maximum 65 Yeras |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | on double entry system in a recongnized society or institution.<br>3. Experience in working with accounting software for at least 2 years | 2. MBA/PGD in Financial management. | |
| Tuberculosis Health Visitor (TB HV)<br><br>(NTEP Department) | 1 | 15500 | ST -1 | 1. Graduate in science<br>OR<br>2. Intermediate (10 + 2) in science and experience of working as MPW/LHV/ ANM/ Health worker / Certificate or higher course in Health Education / Counselling<br>OR<br>3.Tuberculosis health visitor's recognized course<br>4.Certificate course in computer operations (minimum two months) | Training course for MPW or recognized sanitary inspector's course | Maximum 65 Yeras |

अटी व शर्तीः-

१) इच्छुक उमेदवारांनी दि.१८/०६/२०२१ ते दि.२८/०६/२०२१ रोजी शासकीय सुटटीचे दिवस सोडुन सकाळी ११ ते सायं ३:०० या कालावधीपर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज व जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हताचे कागदपत्रे पोस्ट, स्पीड पोस्ट, कुरीयर ने सादर करावीत. दिनांक २८/०६/२०२१ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत कार्यालयीन टपाल किंवा बायहॅन्ड अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

३) अर्ज पोस्ट, स्पीड पोस्ट, किंवा कुरियर ने विहीत मुदतीत प्राप्त झाले तरच त्या अर्जाचा विचार करण्यात येईल. कोरोना - १९ विषाणु प्रादुर्भाव लक्षात घेता अर्ज इतरत्र माध्यमाने किंवा बायहॅन्ड स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी

४) **प्राप्त झालेल्या अर्जावरुन Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुणावरुन शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. (गुणांसंबंधी अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे) अंतिम मेरीटलिस्ट jcmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल**

५) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून प्रकल्प कालावधी पुरताच असल्याने प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

७) निवड करण्यात येणारे उमेदवार पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावे तसेच निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला अथवा प्रलंबित नसावा. त्यासंदर्भातील मेडिकल सर्टिफिकेट मनपा दवाखाने येथुन चाचण्या करुन झालेनंतर प्राप्त करुन घ्यावे व चारित्र्य पडताळणीबाबतचा अहवाल संबंधीत जिल्हयातील पोलिस स्टेशन येथे अर्ज करुन प्राप्त करुन घेतलेनंतरच नियुक्ती देण्यात येईल.

८) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा. जर मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधुन सादर केलेला असेल, परंतु सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास किंवा कागदपत्रे जोडलेली नसल्यास उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

९) सहसंचालक ( अतांत्रिक) रा.आ.अ.मुंबई यांचे क्र.राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि.२०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल. आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध होताच इतर संवर्गातील नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी त्यांना कोणतीही नोटीस वगैरे दिली जाणार नाही.

१०) निवड झालेल्या उमेदवाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११) अर्जदाराने कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन किंवा राजकीय दबाबतंत्र इत्यादी वगैरे केल्यास त्याचा अर्ज रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्याला निवड प्रक्रियेतुन बाहेर काढण्यात येईल.

१२) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१३) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार आवश्यकता भासल्यास निवड प्रक्रियेसाठी, पात्र उमेदवारांच्या मुलाखती, स्किल टेस्टसाठी बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१४) अर्जाचा नमुना हा जाहिरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, खाडाखोळ असल्यास उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१५) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

**१६) विहीत नमुन्यातील अर्जासोबत सर्व छायांकित प्रती १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका शेवटच्या वर्षाची प्रमाणपत्र (ज्या उमेदवाराचे ग्रेडनुसार टक्केवारी असेल त्यांनी ग्रेडसहीत छायांकित प्रत जोडावी) (टिपः सर्व वर्षांचे प्रमाणपत्र सादर करु नये तसेच अतिरिक्त किंवा इतर कागदपत्रे सादर करु नये) ३) गुणपत्रिका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (आवश्यक असलेल्या पदांसाठी), मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या उमेदवाराने जातीचे प्रमाणपत्र तसेच ३० टक्के महिला राखीव उमेदवाराने त्यासंदर्भातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.**

१७) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी.

२१) सदर प्राप्त अर्जावरुन व उमेदवाराने जोडलेल्या छायांकित प्रतीवरुन पात्र उमेदवारांची मेरीट लिस्ट तयार होणार असल्याने, नियुक्ती नंतर कामावर रुजु होतांना आपण सादर केलेली माहिती आपल्या मुळ कागदपत्रांशी पडताळली जाणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास आपले नियुक्त आदेश रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२२) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर (नॉन ज्युडिशियन स्टॅम्पपेपरवर) करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२३) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल. त्याबाबत कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

२४) उमेदवाराने अर्ज व सर्व कागदपत्रे जोडुन लिफापयात बंद करुन लिफाप्यावर प्रवर्ग टाकुन कोणत्या पदासाठी अर्ज केलेला आहे ते त्यावर लिहावे. (३० टक्के महिला राखीव उमेदवार असल्यास प्रवर्गासहीत त्यावर तसे नमुद करावे) सदर अर्ज पोस्ट, स्पीड पोस्ट, कुरीयर नेच पाठवावे. **उमेदवार केवळ एकाच पदासाठी अर्ज करु शकतो. उमेदवारानें विविध पदांसाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची दक्षता घेऊनच अर्ज सादर करावे. विविध पदांसाठी आलेल्या उमेदवाराचे अर्ज रदद करण्यात येईल. त्याबाबत सदर उमेदवाराला कोणतीही सुचना देण्यात येणार नाही.** सदर अर्ज कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता इतरत्र माध्यमाने अथवा कार्यालयीन टपालाने किंवा बायहॅन्ड कोणत्याही सबबीवर स्विकारण्यात येणार नाही. अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे कागदपत्रे ही पुर्ण असावी. अपुर्ण असल्यास सदरचा अर्ज रदद करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. खुल्या प्रवर्गासाठी उमेदवाराने १५०/- रुपये तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठी उमेदवाराने १००/- रुपये

रक्कमेचा कुठल्याही बँकेचा आणि कोणत्याही शाखेचा डीडी **Corporation Integrated Family & Welfare Society Jalgaon** च्या नावाने अर्जासोबत सादर करावे.

२५) विहीत नमुन्यातील अर्ज खालील दिलेल्या पत्यावर पाठविण्यात यावे.

सदर अर्ज पहिला मजला, कै.डि.बी. जैन मनपा हॉस्पिटल, शिवाजीनगर, जळगांव पिन कोड – ४२५००१ एनयुएचएम शहर लेखा व्यवस्थापक यांचे कार्यालय येथे पोस्टाने, स्पीड पोस्ट, कुरीयर ने पाठविण्यात यावे.

**सही/-**

**आयुक्त तथा अध्यक्ष**
मनपा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कंल्याण
सोसायटी,एनयुएचएम
जळगांव शहर मनपा जळगांव

**लिफाफावरील वरील नमुना**

पदाचे नांव - (जाहिरातीत दिल्याप्रमाणे) प्रवर्ग - (३० टक्के महिला राखीव असल्यास तसे प्रवर्गासहीत नमुद करावे)

प्रति,
मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
पहिला मजला, कै.डि.बी. जैन मनपा हॉस्पिटल, शिवाजीनगर, जळगांव ४२५००१
एनयुएचएम शहर लेखा व्यवस्थापक यांचे कार्यालय
जळगांव शहर मनपा जळगांव

प्रेषक - उमेदवाराचे नांव, संपुर्ण पत्ता, मोबाईल नंबर